॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/५/नुतनीकरण-२०२६-२७/ डी.ओ. 10 / 100 /२०२६ दिनांक : 17-06-2026

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाल, ता-रावेर
ता. रावेर जि. जळगाव

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराच्या मान्यतेबाबत

संदर्भ :- १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी / नैसर्गिक विस्तारासाठी [Continuation of Affiliation / Natural Growth] सादर केलेला प्रस्ताव.

२) विद्यापीठाद्वारे जा.क्र KBCNMU/05/ Nutani-NG-2026-27/D.O. 10/ 37/ 2026 दि. 12-03-2026 रोजी नियुक्त करण्यात आलेली स्थानिक तपासणी समिती

३) मा. विद्यापरिषद ठराव क्र. २६/२०२६ दि. ०९/०६/२०२६

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्नीकरणाचे नूतनीकरण / नैसर्गिक विस्तारास मान्यता प्राप्त होण्यासाठी आपल्या महाविद्यालयाने संदर्भ क्र. १ अन्वये विद्यापीठास प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, संदर्भ क्र. २ अन्वये विद्यापीठाने स्थानिक तपासणी समितीची नियुक्ती केली होती. समितीने आपल्या महाविद्यालयास भेट देऊन आवश्यक तपासणी केली व त्याबाबतचा अहवाल विद्यापीठास सादर केला.

स्थानिक तपासणी समितीच्या अहवालाची मा. अधिष्ठाता मंडळाने छाननी व पडताळणी करून आवश्यक शिफारशी केल्या आहेत. सदर शिफारशींना मा. विद्यापरिषदेने मान्यता प्रदान केली असून, त्याअनुषंगाने सोबतच्या तक्त्यात नमूद विषय / अभ्यासक्रमांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ११४(१) नुसार दर्शविलेल्या कालावधीकरिता संलग्नीकरणाचे नूतनीकरण / नैसर्गिक विस्तार (Continuation of Affiliation / Natural Growth) मंजूर करण्यात येत आहे.

आपल्या महाविद्यालयास प्रदान करण्यात येत असलेली ही मान्यता केवळ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पुरती मर्यादित असून, सदर मान्यतेचे वेळोवेळी नूतनीकरण करणे बंधनकारक राहील.

तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०८ नुसार विद्यापीठाने निदर्शित केलेल्या अटी, त्रुटी व सूचनांची पूर्तता करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील. यासाठी स्थानिक तपासणी समितीने नमूद केलेल्या अटी व त्रुटींची परिपूर्ण पूर्तता करून आवश्यक कागदपत्रांसह अटीपूर्तता अहवाल तीन महिन्यांच्या आत, तसेच शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर करावा.

निर्धारित मुदतीत अटीपूर्तता अहवाल सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता महाविद्यालयाकडून सादर करण्यात येणारे कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सोबतच्या तक्त्यात ज्या अभ्यासक्रमांसमोर प्रथम वर्ष व / किंवा थेट द्वितीय वर्षाकरिता **"No Admission"** असे नमूद केलेले असेल, त्या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता केवळ संलग्नीकरणाचे नूतनीकरण / नैसर्गिक विस्तारास मान्यता देण्यात आलेली आहे. अशा अभ्यासक्रमांकरिता प्रथम वर्ष अथवा थेट द्वितीय वर्ष स्तरावर कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश देऊ नये.

तथापि, संबंधित महाविद्यालयाने प्राचार्य, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक व शिक्षकांच्या रिक्त पदांच्या नियुक्तीबाबत तसेच स्थानिक तपासणी समितीने नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेबाबत रु. ५००/- च्या गैरन्यायिक मुद्रांकपत्रावर नोटरीकृत हमीपत्र सादर करावे. तसेच रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे दस्तऐवजीकरण सादर करून विद्यार्थी प्रवेशास परवानगी मिळण्याबाबत विद्यापीठाकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा. मात्र, विद्यापीठाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल.

यासंदर्भात पुढे नमूद करण्यात येते की, परिनियम ४१५(१) नुसार मंजूर एकूण पदांपैकी किमान ५० टक्के पदे भरणे बंधनकारक आहे. ज्या महाविद्यालयांनी अद्याप ही अट पूर्ण केलेली नाही, त्यांनी रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबाबतचे पुरावे व लेखी खुलासा तीन महिन्यांच्या आत विद्यापीठास सादर करावा. अन्यथा, संलग्नीकरणाच्या नूतनीकरणास प्रदान करण्यात आलेली मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

ज्या महाविद्यालयांच्या प्रकरणी न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित आहे, अशा प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद (NAAC) तसेच आवश्यकतेनुसार राष्ट्रीय मान्यता मंडळ (NBA) यांची मान्यता प्राप्त करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

तरी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

म.कळावे,

ग. मा. पवार
उपकुलसचिव (से.नि.)
संलग्नता विभाग

सोबत :

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता.

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२) मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
३) मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पहिला मजला जीवन प्राधिकरण भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जळगांव
४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उ.म.वि., जळगांव
५) मा. सहाय्यक कुलसचिव/कक्षाधिकारी, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, कबचौ उमवि, जळगांव
६) सहाय्यक कुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, बी.सी. सेल, कबचौ उ.म.वि., जळगांव
७) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, कबचौ उमवि, जळगांव

जा.क्र. कबचौउमवि/५/नुतनीकरण-२०२६-२७/ डी.ओ. 10/100/२०२६. दिनांक : 17-06-2026 चे सहपत्र

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता

Name of College : [E551896] - [180128] - ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE PAL TQ.RAVER DIST. JALGAON, Tal. Raver, Dist. Jalgaon

Details of Division for Nutanikaran for A.Y 2026-27 [As per Proposal]

Sr.	Course - Year	Division Details		
		Division No.	Intake	Division Type
1	B.SC. - First Year	Div. No. : 1	120	Original Division
2	B.SC. - Second Year	Div. No. : 1	120	Original Division
3	B.SC. - Third Year	Div. No. : 1	120	Original Division
4	B.COM. - First Year	Div. No. : 1	120	Original Division
5	B.A. - First Year	Div. No. : 1	120	Original Division
6	B.A. - Second Year	Div. No. : 1	120	Original Division
7	B.A. - Third Year	Div. No. : 1	120	Original Division

Details of Courses/Subjects for Nutanikaran for A.Y 2026-27 [As per Proposal]

Sr.	Course - Year	Subject Details		
		Subject	Subject Type	Intake
1	B.SC. - First Year	COMPUTER SCIENCE	General	120
		MICROBIOLOGY	General	120
		MATHEMATICS	General	120
		ZOOLOGY	General	120
		BOTANY	General	120
		PHYSICS	General	120
		CHEMISTRY	General	120
		ELECTRONICS	General	120
2	B.SC. - Second Year	ENGLISH	Optional	120
		MATHEMATICS	General	120
		ZOOLOGY	General	120
		BOTANY	General	120
		PHYSICS	General	120
		CHEMISTRY	General	120
		MARATHI	Optional	120
		ELECTRONICS	General	120
3	B.SC. - Third Year	MATHEMATICS	Special	120
		ZOOLOGY	Special	120
		BOTANY	Special	120
		PHYSICS	Special	120
		CHEMISTRY	Special	120
4	B.COM. - First Year	All Compulsary Subjects	-	120
5	B.A. - First Year	MARATHI	General	120
		ECONOMICS	General	120
		POLITICAL SCIENCE	General	120
		GEOGRAPHY	General	120
		HISTORY	General	120
		HINDI	General	120
		ENGLISH	General	120
6	B.A. - Second Year	MARATHI	Special	120
		ECONOMICS	Special	120
		POLITICAL SCIENCE	Special	120

		GEOGRAPHY	Special	120
		HISTORY	Special	120
		COMPULSORY ENGLISH	Compulsory	120
7	B.A. - Third Year	MARATHI	Special	120
		ECONOMICS	Special	120
		POLITICAL SCIENCE	Special	120
		GEOGRAPHY	Special	120
		HISTORY	Special	120
		COMPULSORY ENGLISH	Compulsory	120

A] Observations of Present LIC :

(1) Regular Principal and Physical Director are appointed
(2) Environmental friendly campus is available
(3) Sports facilities are satisfactory
(4) CCTV campus along with botanical garden and R.O. water facility
(5) Co-operative teaching and non-teaching staff

B] Conditions of Previous LIC :

(1) NAAC accreditation as early as possible regular librarian should be appointed as early as possible
(2) Separate ladies room for girls students, indoor, and outdoor sports equipment should be purchesed
(3)

C] Conditions of Present LIC :

(1) The science laboratories should be shifted and updated with the necessary equipment
(2) Separate ladies rooms with wending machine and other necessary equipments should be developed
(3) The computer labs should be equiped with wifi and other digital equipments. The institute should go through the process of NAAC and apply for 2(F) and 12(B) recognitions. Sufficient teaching staff should be fulfilled. Purchase text books and reference books along with necessary journals belonging to all the subjects.

Approval of University to Continuation of Affiliation / Natural Growth for A.Y 2026-27 :
Continuation of affiliation has been granted for Academic Year 2026-2027.

ग. ना. पवार
उपकुलसचिव (से.नि.)
संलग्नता विभाग